संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# आता प्रतीक्षा प्रतिहल्ल्याच्या वेळेची

**पुलवामातल्या** दहशतवादी हल्ल्याच्या जखमा इतक्या गहिऱ्या स्वरुपाच्या आहेत. की त्या पुढची अनेक वर्षे भरून निघणे शक्य नाही. गेले दोन दिवस देशभरात विविध ठिकाणी या हल्ल्यामध्ये हुतात्मा झालेल्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणामध्ये अंत्यसंस्कार केले गेले. एक तरुण जवान ज्या ज्या गावांचे होते. त्या ठिकाणी किंवा परिसरातील अक्षरशः लाखो लोकांनी गर्दी करून आपल्या या जवानांच्या बलिदानाला मानवंदना दिली. निम्म्यापेक्षा जास्त जवान हे पस्तीस वर्षाच्या आतले होते. चाळीस कुटुंबातले संसार आज उघड्यावर पडले आहेत. देशासाठी त्यांनी केलेला हा त्याग इतक्या उच्च कोटीचा आहे. की त्याची कशाशीही तुलना होऊ शकत नाही. त्यांनी सांडलेल्या रक्ताचे मूल्यच जाणून घ्यायचे असेल तर शत्रुपक्षाला त्याच पध्दतीचा धडा शिकवणे एवढा एकच पर्याय आपल्यासमोर उरतो. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशातील प्रत्येक नागरिकाचे रक्त संतापाने सळसळते आहे. आणि म्हणूनच या हल्ल्याचा वचपा काढण्यासाठी लष्कराला पूर्ण स्वातंत्र्य देण्याचे म्हटले आहे. याचा अर्थ आता लष्करावर जबाबदारी टाकून मोदींना किंवा सरकारला मोकळे होता येणार नाही. या हल्ल्याचा प्रतिकार केव्हा, कुठे आणि कसा करायचा हे सर्वस्वी लष्कराने जरी ठरवायचे असले तरीसुध्दा जो काही प्रतिकार केला जाईल त्यात आपल्या देशाचे नुकसान होणार नाही. याची तितकीच खबरदारी घ्यावी लागेल. यासाठीच केंद्र सरकारने जगातल्या सर्व प्रमुख राष्ट्रांच्या अध्यक्षांशी संपर्क करून पाकिस्तानशी संपर्क करून कृतघ्नपणाची कल्पना दिली आहे. अमेरिका, इंग्लंड ,जपान, जर्मनी, उत्तर कोरिया, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स,चीन या सर्व प्रमुख राष्ट्रांना पाकिस्तान हा कसा दहशतवाद पोसतो आहे. याची पुन्हा एकदा माहिती दिली. चीन वगळता सर्व राष्ट्रांनी भारताच्या भूमिकेचे समर्थन केले आहे. म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली बाजू भक्कम करीत असताना भारत ज्या मुत्सद्देगिरीचा वापर करीत आहे त्यामध्येसुध्दा चीनसारख्या शेजारी राष्ट्राने आढावूपणा केलेला दिसून येतो.

## चीनचा आढावूपणा

या हल्ल्यामागे असलेला जैश ए मोहम्मदचा कमांडर मौलाना मसूद अझहर याला दहशतवाद्यांच्या आंतरराष्ट्रीय यादीमध्ये समाविष्ट करावे अशी मागणी भारताने सुरक्षा परिषदेत केली होती.सगळ्या देशांना भारताला पाठिंबा दिल्यानंतरही चीनने मात्र पाकिस्तानच्या म्हणजेच मसूद अझहरच्या पाठीशी राहण्याचा निर्णय घेतला आणि आता एवढा मोठा हल्ला ज्या मसूद अझहरमुळे झाला त्याविरुध्द भूमिका घ्यायला चीन आताही तयार नाही. याचा अर्थ भारताकडून जी काही कारवाई होईल. त्याला चीनचा विरोध होऊ शकतो. चीन पाकिस्तानच्या पाठीशी उभा राहू शकतो. हे समजून घेतले पाहिजे. म्हणूनच पाकिस्तानविरुध्द आता जो काही लढा लढला जाईल. तो भारताला स्वतःच्या ताकदीवरच लढावा लागेल. एवढेच नव्हे तर चीनसारखा उद्दाम देश भारताला जाणीवपूर्वक त्रास देण्याची शक्यता आहे. पंतप्रधानांनी लष्कराला पूर्णस्वातंत्र्य दिल्याचा उल्लेख जरी केला असला तरी कोणतेही लष्कर कोणत्याही प्रतिकाराची पूर्ण जबाबदारी घेत नसते. कारण या प्रतिकाराचा किंवा प्रतिहल्ल्याचा आंतरराष्ट्रीय स्तरावर परिणाम होत असतो. म्हणूनच केंद्र सरकारची आंतरराष्ट्रीय स्तरावरची मुत्सद्देगिरी तितकीच कौशल्यपूर्ण आणि आक्रमक असावी लागेल. ज्यामुळे पाकिस्तानला एकटे पाडणे शक्य झाले पाहिजे. मात्र सर्जिकल स्ट्राईकसारखा गनिमी कावा वापरायचा असेल तर भारतीय लष्कर पूर्ण ताकदीनिशी आपले कौशल्य दाखवेल यात काही शंका नाही. अशाच स्वरुपाचे मोजकेच पर्याय भारताजवळ उपलब्ध आहेत. केवळ संतापाच्या भरात किंवा बदला घेण्याच्या बुध्दीने वाटेल तशी कारवाई करून चालणार नाही. बेसावधपणे आणि योग्य ठिकाणी भारताने गनिमी पध्दतीने हल्ले केले तर एकाच प्रयत्नात अनेक दहशतवादी किंवा पाकिस्तानी जवान नाहीसे होऊ शकतील. देशातील सामान्य जनता आता त्या प्रबळ अशा प्रतिहल्ल्याची आतुरतेने वाट पाहात आहे. मोदी म्हणाले त्याप्रमाणे अशा हल्ल्याची वेळ किंवा पध्दती लष्कर ठरवणार असले तरी त्याची देशातला प्रत्येकजण अक्षरशः वाट पाहतो आहे. ही गोष्ट खरीच आहे की पाकिस्तान म्हणा किंवा जैश ए मोहम्मद यांनी प्रचंड मोठी घोडचूक केली आहे. त्याची त्यांना तितकीच जबर किंमत मोजावी लागेल. यासाठी भारत जी काही कारवाई करेल त्याला चीन वगळता संपूर्ण जगाचा पाठिंबा असेल. हीदेखील आज वस्तुस्थिती आहे.

## देशातले काही गद्दार

आता केवळ त्या प्रतिहल्ल्याची प्रत्येकजण प्रतीक्षा करतो आहे. धक्कादायक गोष्ट अशी आहे की या सगळ्या अतिशय गंभीर वातावरणात आपल्या देशातील काही गद्दारांनी जी वक्तव्ये केली किंवा फेसबुक ट्विटरवरून जी काही गरळ ओकली. ती पाहिल्यानंतर तिथलेच मीठ खाऊन याच भूमीचे ईमान विकणारे पाकिस्तानी दलाल इथे शाबूत आहेत. त्यांना खड्यासारखे वेचून काढले पाहिजे आणि ठेचूनही काढले पाहिजे. अलिगढ मुस्लिम विद्यापीठात काही तरूणांनी ट्विटरवर वापरलेली भाषा देशाच्या एकतेला धोका निर्माण करणारी होती. तोच प्रकार देश के टुकडे टुकडे हो जाएंगे असे म्हणणाऱ्या दिल्लीतल्या जेएनयू विद्यापीठातील टुकडे गँगच्या सभासदांनी त्याच गद्दारी मनोवृत्तीचे प्रदर्शन मांडले. सगळा देश सरकारच्या आणि लष्कराच्या पाठीशी असताना जर काही देशद्रोही लोक नकळतपणे या हल्ल्याचे समर्थन करीत असतील तर भारताला अंतर्गतच किती मोठा धोका आहे हे सिध्द होते. अशा लोकांवर देशद्रोहाचेच खटले भरले पाहिजेत. लोकशाही किंवा अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली त्यांचा हा उद्दामपणा अजिबात खपवून घेता कामा नये. लोकसभा निवडणुकीपूर्वी पाकिस्तानच्या किंवा दहशतवाद्यांच्या भेकडपणाचा सोक्षमोक्षा लावावा लागेल.